# उदयोजकता जागृती मोहिम

जळगाव : यशस्वी उदयोजक होण्यासाठी आवश्यक असलेले गुण, पात्रता आणि त्यातील बारकावे याबाबत तज्ज्ञांचे विदयाथ्र्यांना मार्गदर्शन मिळावे याकरीता 11 ते 13 ऑक्टोबर दरम्यान तीन दिवसीय उदयोजकता जागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

मू.जे. महाविदयालयाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विदयाशाखेच्या आणि महाराष्ट्र उदयोजकता विकास केंद्र, औरंगाबाद यांच्या संयुक्त विदयमाने ही मोहिम आयोजीत करण्यात आली आहे. दोन्ही आयोजकांमध्ये नुकत्याच झालेल्या करारानुसार विदयाथ्र्यांना उदयोजकतेच्या क्षेत्रात प्रवेश करून भविष्य उज्वल बनविण्यासाठी मदत करण्यात येणार आहे.

महाविदयालयाच्या जुन्या कॉन्फरन्स हॉल येथे हा कार्यक्रम सकाळी 10 वाजेपासून सुरू होईल. विदयाथ्र्यांसाठी 354 रूपये नोंदणी फी असून विदयाथ्र्यांनी सहभागासाठी प्रा.योगेश रोटे (9766615490) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन विदयाशाखेतर्फे उपप्राचार्य प्रा. ए. पी. सरोदे व आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

प्रा.विश्वजीत चौधरी
प्रसिध्दी समिती चेअरमन
9420383778